# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२२३१०४ E-Mail : registrar.gondwanauniversity@gmail.com

जा.क्र./गोंवीग/कुसका/४८४१ /२०१७ दिनांक १० /०८/२०१७

## अधिसुचना

सर्वसामान्याच्या माहितीसाठी सुचित करण्यात येत आहे की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम 32(3)(g) च्या तरतुदी अंतर्गत विद्यापीठातील प्रत्येक विद्याशाखेचे विद्वत परिषदेवर प्रतिनिधीत्व करण्यासाठी विद्याशाखा निहाय २ शिक्षक (एकूण ८) निवडून द्यावयाचे आहेत.

असे असले तरी विद्यापीठामधील प्रत्येक विद्याशाखा ही जातीसंवर्ग निहाय आरक्षित करावयाची असून एकूण ८ जागांपैकी एका विद्याशाखेची एक जागा महिलेसाठी आरक्षित करावयाची आहे हे आरक्षण सोडतिच्या चिठ्ठीद्वारे निश्चीत केले जाणार असल्यामुळे निर्देश क्रमांक 9-F/2017 च्या परिच्छेद ६ मध्ये नमुद असलेल्या प्रक्रियेच्या अधिन राहून चिठ्ठी काढावयाची आहे.

करीता सर्व संबंधीतांना सुचित करण्यात येते की, वरील परिच्छेदामध्ये नमुद असलेले आरक्षण निश्चित करण्यासाठी मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या सभागृहामध्ये दि.१४/०८/२०१७ रोजी दुपारी १.०० वाजता सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सबब संबंधीतांनी सदर आरक्षण निश्चितीमध्ये सहयोग देण्यासाठी उपस्थित रहावे.

(दिपक जुनघरे)
कुलसचिव (का.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली